# मंत्रीपद : अमरावतीच्या हाती खुळखुळा





## पुन्हा मिळणार उंटावरुन शेळ्या हाकणार पालकमंत्री ?

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )-** महायुती सरकारच्या नव्या मंत्रिमंडळात समाविष्ट आमदारांचा शपथविधी रविवारी नागपुरात पार पडला. त्यात जिल्ह्यातील एकाही आमदाराचा मंत्रिपद मिळाले नसल्याने महायुतीने अमरावतीच्या हाती खुळखुळा भेटला असल्याचे दिसत आहे. अमरावतीला मंत्रीपद मिळेल अशी आशा अमरावतीकर जनतेला होती.परंतू तसे झाले नाही, मात्र दुपारी भाजप आणि महायुतीच्या दोन्ही आघाडीच्या सर्व मंत्र्यांच्या नावांची घोषणा करण्यात आली. महायुतीला सात जागा देवूनही अमरावती जिल्ह्याला मंत्री न भेटल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. आता अमरावतीला पुन्हा एकदा उंटावरुन शेळ्या हाकणारा पालकमंत्री मिळेल यात दुमत नाही.

जिल्ह्यातील आठ विधानसभा जागांपैकी 7 जागांवर महायुतीच्या उमेदवारांनी नेत्रदीपक विजय मिळवला. यामध्ये सुलभा खोडके व प्रताप अडसड हे दुसऱ्यांदा विजयी झाले. युवा स्वाभिमानचे रवी राणा सलग चौथ्यांदा विजयाची नोंद करण्यात यशस्वी ठरले. याशिवाय प्रवीण तायडे, केवलराम काळे, राजेश वानखडे, उमेश यावलकर हे प्रथमच निवडणुकीत विजयी झाले. दर्यापूरमधून केवळ उबाठाचे गजानन लवटे विजयी होऊ शकले. अशाप्रकारे 7 जागा मिळवूनही मंत्रिमंडळात स्थान न मिळाल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. निवडणुकीतील राज्यातील प्रसिद्ध चेहऱ्यांमध्ये बच्चू कडू, यशोमती ठाकूर, राजकुमार पटेल, डॉ.सुनील देशमुख, प्रा. वीरेंद्र जगताप, बबलू देशमुख, अभिजीत अडसूळ अशा लोकांना पराभवाला सामोरे जावे लागले. आजही बच्चू आणि यशोमती यांचा पराभव त्यांच्या समर्थकांना पचवता आलेला नाही.

### राणा, खोडके, अडसड होते चर्चेत

विधानसभा निवडणुकीत मिळालेल्या घवघवीत यशानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच्या सुलभा खोडके, मुख्यमंत्र्यांचे निकटवर्तीय रवी राणा, भाजपचे निष्ठावंत प्रताप अडसड या तिघांपैकी कुणाची तरी मंत्री पदाकरिता वर्णी लागेल अशी आशा होती. याशिवाय राज्यसभा खासदार आणि माजी कृषिमंत्री डॉ.अनिल बोंडे यांचेही नाव पुढे करण्यात आले. त्यांना विधानपरिषदेत स्थान देण्याबाबत आणि त्यांच्या जागी नवनीत राणा यांना राज्यसभेवर पाठवण्याची जोरदार चर्चा उघडपणे झाली. यापैकी एकाही अपेक्षित चर्चेला जागा न मिळाल्याने सरकारविरोधात नाराजीची भावना आहे.

# मेळघाटवरील बालमृत्यू, मातामृत्यूचा डाग दशकभरानंतर हटला

## बालमृत्यू, मातामृत्यूच्या दरात लक्षणीय घट

## आरोग्य विभागाचा दावा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.15 )-** जिल्ह्यातील धारणी आणि चिखलदरा तालुक्यातील मेळघाट भागावरील बालमृत्यू आणि मातामृत्यूचा डाग दशकभरानंतर प्रशासनाच्या शर्तीच्या प्रयत्नाने हटला आहे. गेल्या कालावधीत जिल्हाप्रशासनाच्या विशेष लक्षामुळे आरोग्य सेवा परिणामकारक राबविण्यात येत आहे. तसेच सेवेवर अंकुश ठेवण्यासाठी भरारी पथकांची निर्मिती करण्यात आल्याने आरोग्य सुविधा आणि सेवांच्या दर्जात सुधारणा झाली असल्याचा दावा आरोग्य विभागाने केला आहे.

गेल्या दहा वर्षाच्या आकडेवारीचा अभ्यास करून मेळघाटात 'मेळघाट मिशन 28' राबविण्यात आले आहे. यात प्रामुख्याने जिल्हा प्रशासनाच्या मदतीने उपजिल्हा रूग्णालय, ग्रामीण रूग्णालय, 11 प्राथमिक आरोग्य केंद्रासह विविध सुविधा, 7 फिरती आरोग्य पथक, 6 प्राथमिक आरोग्य पथक, 93 उपकेंद्र, 22 भरानी पथकांमार्फत आरोग्य सेवा देण्यात आली. परिणामस्वरूप 2013-14 मध्ये 338 असणारा बालमृत्यू हा सन 2023-24मध्ये 156वर आला आहे, तर दहा वर्षापूर्वी 14वर असणारा मातामृत्यू दर हा 5 आणण्यात आरोग्य यंत्रणेला यश मिळाले



आहे. महत्वाचे म्हणजे उपजत मृत्यू 134 वरून 79 वर आणण्यात आले असल्याचे सांगण्यात येत आहे.

मातामृत्यू आणि बालमृत्यू जाणिवपूर्वक कमी करण्यासाठी मेळघाट क्षेत्रात गरोदरमाता, स्तनदा माता, बालकांना स्त्री रोग व बालरोग तज्ज्ञांची सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहे. दर 15 दिवसांनी चक्रकार पद्धतीने ग्रामीण रूग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर विशेष तपासणी करण्यात येत आहे. अतिजोखमीच्या बालकांची जबाबदारी बालउपचार केंद्र आणि पोषण संवर्धन केंद्रावर सोपविण्यात आली आहे. सन 2024-25 मध्ये ऑक्टोबरअखेर 25 बालउपचार केंद्रामध्ये 127 बालकांना भरती करण्यात आले, यात 54 मुलांमध्ये कमालीची सुधारणा झाली आहे. पोषण संवर्धन केंद्रात ऑक्टोबरअखेर 381 बालकांची भरती करण्यात आली, यात 197 बालकांमध्ये सुधारणा झाली असल्याचे आरोग्य विभागाचे म्हणणे आहे.

### 'मेळघाट मिशन 28' परिणामकारक

मातामृत्यू आणि बालमृत्यूला पायबंद घालण्यासाठी 1 जानेवारी 2022 पासून 'मेळघाट मिशन 28' राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत प्रसृतीच्या 28 दिवस अगोदर आणि नवजात अर्भकास 28 दिवस अंगणवाडी सेविका, आशामार्फत दैनिक भेटी देण्यात येते. यामुळे संस्थात्मक प्रसृतीची टक्केवारी 96 पर्यंत पोहोचली आहे. मेळघाटातील अतिसंवेदनशिल गावांमध्ये आरोग्य सेवा पुरविण्यासाठी नवसंजीवनी योजनेंतर्गत धारणी तालुक्यात 12 आणि चिखलदरा तालुक्यात 10 असे 22 भरारी पथके कार्यान्वित आहेत. भरारी पथकात मानसेवी वैद्यकीय अधिकारी अखंडीत सेवा देत आहेत. त्यामुळे माता आणि बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्यात भरारी पथके मोलाचे सहकार्य देत आहेत.मानव विकास कार्यक्रमांतर्गत ऑक्टोबरअखेर 105 शिबीरे प्राथमिक आरोग्य केंद्रस्तरावर आयोजित करण्यात आले आहे. यात तज्ज्ञांमार्फत 4300 गरोदर माता, 670 जोखीमग्रस्त माता, 737 स्तनदा माता आणि 6 महिन्यापर्यंतचे सर्व बालके, तसेच कमी वजन असलेले 771 बालकांची तपासणी करण्यात येऊन उपचारात्मक कार्यक्रम राबविण्यात आले. यातील सर्वांना संदर्भ सेवा पुरविण्यात आल्या आहेत.

# खोट्या ई टॅगवर जनावरांची खरेदी-विक्री

## रॅकेटचा पर्दाफाश, चांदूर रेल्वे पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे,( दि.15 ) -** अंजनसिंगी येथील बाजारपेठेतून खरेदी-विक्री करून खोटे ई-टॅग लावून कत्तलखान्यात नेणार्या येत असल्याचा प्रकार चिरोडी गावाजवळ उघडकीस आला. चांदूर रेल्वे पोलिसांनी गुरांची तस्करी करणाऱ्या वाहनांवर कारवाई करून ती वाहने जप्त केली आहे. गोवंशांना धामणगाव गोशाळेत पाठविण्यात आले.

चांदूर रेल्वे पोलिसांना गुरांची अवैध तस्करी होत असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्याआधारे पोलीस कर्मचारी अजय आकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी चिरोडी गावाजवळ नाकाबंदी केली. जेथे 4 वेगवेगळ्या वाहनांतून 8 गुरे घेऊन जाणाऱ्या चालकाची चौकशी करण्यात आली. चौकशीत चालकाने सांगितले की, जनावरांच्या बाजारातून जनावरे खरेदी केली होती, ज्यावर ई-टॅग होते आणि आमच्याकडे खरेदी-विक्रीच्या पावत्या असे सर्व ठोस पुरावे आहेत. पोलिसांनी पावती तपासून सरकारी संकेतस्थळावरील ई टॅग तपासला असता तो खोटा असल्याचे समोर आले. पोलिसांनी त्यांची कसून चौकशी केली असता वाहन चालकाने गुरे कत्तलखान्यात नेत असल्याचे सांगितले. याप्रकरणात पोलिसांनी 7 आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून चार वाहने जप्त केली आहेत. या कारवाईमुळे गोवंश तस्करीचे मोठे रॅकेट उघडकीस येण्याची शक्यता आहे.

# चुकीच्या उपचारामुळे इंजिनिअरचा मृत्यू?

## आईने केला आरोप

## राजापेठ पोलिस ठाण्यात तक्रार दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )-** गणपती नगरात राहणाऱ्या 35 वर्षीय अभियंत्याचा डॉक्टरांच्या चुकीच्या उपचारामुळे मृत्यू झाल्याचा आरोप आईने राजापेठ पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीतून केला आहे. दीपक रमेश आठवले (35, रा. आदिशक्ती अपार्टमेंट, गणपती नगर) असे मृत तरुणाचे नाव आहे. या घटनेने परिसरात चांगलीच खळबळ उडाली असून, नातेवाईकांनी रोष व्यक्त केला.



आई शोभा आठवले यांच्या तक्रारीनुसार, दीपक आठवले हा अभियंता होता. तो अमरावतीच्या ईसीई सोलर कंपनीत नोकरीला होता. गेल्या दोन वर्षांपासून तो गणपती नगर येथील आदिशक्ती अपार्टमेंटमध्ये राहत होता. 12 डिसेंबर रोजी दीपक आठवले यांना ताप आणि थंडी जाणावू लागली. त्यानंतर त्यांना गोपाळ नगर येथील डॉ. विवेक भोयर यांच्या रुग्णालयात नेण्यात आले. जिथे डॉक्टरांनी उपचार केले. ज्यामुळे त्याला दिलासा मिळाला. मात्र त्यानंतर दुसऱ्या दिवशी त्यांची प्रकृती खालावली. 14 डिसेंबर रोजी सायंकाळी खूप ताप आल्याने त्यांना पुन्हा डॉक्टरांच्या दवाखान्यात उपचारासाठी नेण्यात आले. जिथे डॉक्टरांनी त्याला सलाईनचे तीन इंजेक्शन दिले. त्यानंतर आई आणि मुलगा दोघेही घरी परतले. घरी परतल्यानंतर पाच मिनिटांतच दीपकला थंडी जाणवू लागली. दीपकच्या आईने डॉक्टरांना फोन करून घरी बोलावले. जिथे डॉक्टरांनी त्याला पुन्हा इंजेक्शन दिले. त्यानंतर त्यांची आणखी तब्येत बिघडली. त्यानंतर दीपकची आई शोभा यांनी दिपकला ऑटोमध्ये बसवून खासगी रुग्णालयात नेले. यावेळी डॉक्टरही त्यांच्यासोबत होते. ते एका खासगी रुग्णालयात गेले असता डॉक्टरांनी त्यांना इर्विन रुग्णालयात जाण्यास सांगितले. त्यानंतर डॉक्टर तेथून पळून गेला. शोभा आठवले यांनी दीपकला इर्विन रुग्णालयात नेले, तेथे डॉक्टरांनी दीपक आठवले यांना मृत घोषित केले. त्यानंतर नातेवाईकांनी संताप व्यक्त केला. डॉक्टरांनेच चुकीचा उपचार केल्याने दिपकचा मृत्यू झाल्याचा आरोप आईने केला. याबाबत फिर्याद शोभा आठवले यांनी राजापेठ पोलीस ठाण्यात दिली.

### जिल्हा सामान्य रुग्णालयात नातेवाईकांची गर्दी

35 वर्षीय मुलाचा अल्पशा आजाराने मृत्यू झाल्याने आई शोभा आठवले यांना मोठा धक्का बसला आहे. तसेच नातेवाईकांमध्येही रोष व्यक्त करण्यात आला. याबाबतची माहिती कुटुंबीयांना मिळताच त्यांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात एकच गर्दी केली. डॉक्टरांवर तत्काळ कारवाई करावी, अशी मागणी नातेवाईकांनी केल्याने खळबळ उडाली. यावेळी पोलिसांनी नातेवाईकांची समजुत काढली. त्यानंतर मृताच्या आईने या घटनेची तक्रार राजापेठ पोलिस ठाण्यात दिली. पुढील तपास पोलिस करीत आहेत.

# भरधाव कारने धडक दिल्याने 14 वर्षीय तरुणाचा मृत्यू



## जमील कॉलनी चौकातील घटना

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )-** भरधाव कारने दिलेल्या धडकेत 14 वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना रविवारी दुपारी 3.30 वाजता नागपूरी गेट पोलीस ठाण्याच्या हद्दीतील जमील कॉलनी चौकात घडली. मोहम्मद ऐजान मोहम्मद रज्जाक (14, रा. हैदरपुरा) असे मृत मुलाचे नाव आहे. या घटनेत मोहम्मद ऐजानचा एक मित्र किरकोळ जखमी झाला आहे. या अपघाताच्या तक्रारीवरून नागपुरीगेट पोलिसांनी अज्ञात कारचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

हैदरपुरा येथील रहिवासी असलेला मोहम्मद ऐजान हा त्याच्या मित्रासोबत जमील कॉलनी येथून पायदळ जात होता.

यावेळी जमील कॉलनी चौकात मोहम्मद ऐजान यांना अज्ञात कारने धडक दिली. ही धडक इतकी भीषण होती की, मोहम्मद ऐजान हा गंभीर जखमी झाला. नागरिकांच्या मदतीने त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिथे डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. या अपघातात त्याचा मित्र किरकोळ जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे.

# गोवंश वाहतुक करणाऱ्या वाहनाला पकडले

## सालबर्डी ते पाळा रोडवरील भिवकुंडी फाट्याजवळ कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.15 )** दोन टाटा मालवाहू गाडीमध्ये गोवंश जनावरे अतिशय निर्दयतेने कोंबून कत्तलीसाठी नेत असतांना सालबर्डी ते पाळा रोडवरील भिवकुंडी फाट्याजवळ पकडण्यात आले. ही घटना 15 डिसे.रोजी 10 वाजताचे सुमारास उघडकीस आली असून, मोर्शी पोलिसांनी नाकाबंदी करून दोन्ही टाटा एक्स वाहनासह 6 लक्ष 66 हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.

मध्यप्रदेश येथून सालबर्डी मार्गे पाळा एम.एच.31 सीबी 9535 व एम एच 04/6885 या क्रमांकाच्या वाहनामध्ये गोवंशांना अतिशय निर्दयतेने व अमानुषरित्या कोंबून कत्तलीसाठी नेले जात असल्याची गोपनीय माहिती मोर्शी पोलिसांना मिळाली होती. या माहितीवरून पोलिसांनी भिवकुंडी फाट्यावर पाळत ठेवून पहिल्या टाटा एक्स गाडीचा ड्रायव्हर कार्तिक संदीप येवतकर (वय 22 वर्ष रा. जलालखेडा) व दुसरी टाटा एक्स गाडीचा ड्रायव्हर धीरज राजेंद्र बडोदे (वय 25 वर्ष रा. चांदस वाठोडा) यांना ताब्यात घेऊन दोन्ही गाड्यांची पाहणी केली असता जनावरांना अमानुषरित्या अगदी क्रूरपणे बांधून ठेवल्याचे आढळून आले. दोन्ही ड्रायव्हर यांना विचारपूस केली असता त्यांच्याकडे खरेदी विक्रीच्या कोणत्याही पावत्या नसून गाडीमधील 6 जनावरे ही साकीब अहमद नाशिर अहमद (वय 25 वर्षे रा. नेरपिंगळाई) यांचे मालकीचे जनावरे असल्याचे त्यांनी सांगितले. लगेच जनावरांना सोडून गाडीतून बाहेर काढून भगवान परशुराम गोसेवा चॅरिटेबल ट्रस्ट नांदगाव पेठ येथे दाखल करण्यात आले. जनावरांचे पालन पोषण व चाऱ्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी आरोपीविरुद्ध भादवी कलम 324 281 तसेच प्राण्यांना निर्देयतेने वागणुक प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. ही धाडसी कार्यवाही उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर, पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली डीबी स्कॉडचे पोलीस उपनिरीक्षक अमोल बुरुकुल, स्वप्निल बायस्कर, छत्रपती करपते यांनी केली आहे.

### आरोपींविरुध्द कठोर कारवाई करा

अवैध जनावरे कत्तलीसाठी नेण्याचा गोरखधंदा दिवसेंदिवस वाढत चालला आहे. महाराष्ट्र शासनाने गोवंश हत्याबंदीचा कायदा करून सुद्धा कायद्याला धाब्यावर बसवून मध्यप्रदेशातून अवैध जनावरांची तस्करी मोठ्या प्रमाणात सुरू आहे.तरी शासनाने वेगळा कायदा अमलात आणून आरोपींविरुद्ध कठोरात कठोर कार्यवाही करावी तसेच आरटीओ मार्फत अशा गाड्यांचे लायसन्स रद्द करण्यात यावे. अशी मागणी या निमित्ताने होत आहे.



### चिंचोली गवळी ते अंबाडा रोडवरही कारवाई

मोर्शी पोलिसांनी चिंचोली गवळी ते अंबाडा रोडवर नाकाबंदी करून चारही वाहन थांबवून गोवंश जनावरांसह 13 लाख 44 हजार रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. 15 डिसेबर रोजी सकाळी 11 वाजताच्या सुमारास ही कारवाई करण्या आली. पोलिसांनी चिंचोली गवळी मार्गोवर टाटा एक्स वाहन क्र.एम.एच.36/ 1874, वाहन क्र.एम एच 35 के 3484, वाहन क्र एम एच 01 बीआर 0417 तसेच वाहन क्र. एम एच 48 टी 7536 या वाहनांची तपासणी करून मुद्देमाल जप्त करण्यात आला. या चारही गाडीत गोवशांना अतिशय निर्दयतेने व अमानुषरित्या कोंबून कत्तलीसाठी नेत होते. याप्रकरणात चालक सुनील रामकृष्ण नेहार (31 वर्ष रा. घोराड तालुका वरुड), मंगेश अंबादासराव सहारे (वय 41 वर्ष रा. घोराड), गौरव गजानन गाडबैल (वय 21 वर्षे रा. घोराड) व राहुल विष्णूजी मोरे (वय 25 वर्षे रा. चांदूरबाजार) यांना ताब्यात घेतले.

# लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार



## मुलाला दिला जन्म

## प्रियकरावर गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.15 )-** चिखलदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका तरुणाने अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात अडकवून, तिला लग्नाचे आमिष दाखविले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. त्यामुळे ती गरोदर राहिली आणि तिने मुलाला जन्म दिला. या घटनेत मुलगी ही अल्पवयीन असल्याचे समोर आले असून, याप्रकरणात पोलिसांनी 14 डिसेंबर रोजी एका 22 वर्षीय तरुणाविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

चिखलदरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या 17 वर्षीय मुलीला एका 22 वर्षीय आरोपी तरुणाने फूस लावून प्रेमाच्या जाळ्यात फसवले. त्यानंतर त्याने तिला लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार केला. अल्पवयीन मुलासोबत शारीरिक संबंध ठेवल्यामुळे ती गर्भवती राहिली. त्यानंतर, 13 डिसेंबर 2024 रोजी पोटदुखीच्या तक्रारीनंतर अल्पवयीन मुलाला रुग्णालयात दाखल करण्यात आले. जिथे अल्पवयीन मुलीने मुलाला जन्म दिला. आई व मूल अल्पवयीन असल्याचे डॉक्टरांच्या निदर्शनास येताच चिखलदरा पोलिसांना ही माहिती देण्यात आली.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# सोनापूर ते चांदपूर मार्ग झाला जीवघेणा

## प्रधानमंत्री सडक योजनेचे काम कासवगतीने



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी,( दि.15 )** - चिखलदरा तालुक्यातील बोराळा पासून सोनापूर, मोरगड, वाकी मार्गे चांदपूर जाणारा 21 किलोमीटर चा रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतून पाहिले खडीकरण व डांबरीकरण काम मंजूर आहे. मात्र ठेकेदाराने सहा ते आठ महिन्यापासून रस्त्यावर गिट्टी पसरविली आहे, ती तशीच पडून असल्यामुळे ये-जा करणाऱ्या प्रवाशांना जीवघेणी ठरत आहे. या कामाबद्दल प्रशासन गंभीर नसून ते प्रवाशांच्या जीवावर बेतत आहे.

चिखलदरा तालुक्यातील बोराळा वरून गंगाधरी, सोनापूर, एकझीरा, मोरगड, वाकी, सत्ती, रुईपाठा, चौर्यमाल, काकादरी, पीपदरी, बहादरपूर व चांदपूर अशी गावे येतात. या गावाला जोडणारा रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेमधून एक वर्षापासून मंजूर आहे. हे काम एका ठेकेदाराने घेतले असून रस्त्यावर फक्त खाडीकरणाच्या नावावर नुसती गिट्टी पसरून ठेवली आहे. सदर जोडरस्ता 21 किलोमीटर लांबीचा असून दररोज या रस्त्यावरून शेकडो नागरिक येजा करतात. येथूनच शाळकरी मुलांचा, गरोदर माता असो की रुग्ण ये-जा करीत असून दररोज रस्त्यावर अपघात घडत आहेत, त्यामुळे प्रवाशी त्रस्त झाले आहे.

### अन्यथा जनआंदोलन उभारु

प्रशासनाने हा मार्ग लवकर सुरळीत करावा अन्यथा रस्त्याकरिता जनआंदोलन उभे करण्यात येईल. सदर रस्त्याचे काम एक वर्षापासून मंजूर आहे. रस्त्यावर ठेकेदारांमार्फत नुसती गिट्टी पसरून ठेवली आहे. परतवाडा जाण्यासाठी हा एकमेव मार्ग असून गिट्टीमुळे रस्त्यावर रोजच अपघात घडत आहेत. त्यामुळे प्रशासनाने याची तत्काळ दखल घेऊन डांबरीकरण करावे अन्यथा मोठे जनआंदोलन करण्यात येईल, असे वाकी गावचे सरपंच राजेश जावरकर, मोरगड गावचे सरपंच अमिताभ भास्कर यांनी सांगितले.

"संबंधित ठेकेदाराशी मी बोललो. तो उद्या पासून प्रत्यक्ष कामाला सुरुवात करीत आहे.

**-प्रफुल्ल जाटे,** कनिष्ठ अभियंता, प्रधानमंत्री सडक योजना.



# श्री संत संताजी जगनाडे महाराज यांचा 400 वा जन्म महोत्सव




**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, ( दि.15 )**-स्थानिक श्रीसंत संताजी जगनाडे महाराज स्व. बाबाराव वा. देवगीरे सांस्कृतीक भवनामध्ये तेली समाज पंचमंडळ अंजनगाव सुर्जीच्या वतीने श्री संत संताजी जगनाडे महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

सकाळी 9 वाजता देवनाथ मठ सुर्जी येथुन पालखीला सुरुवात झाली. पालखी सोहळ्यामध्ये अंजनगाव सुर्जी व परिसरातील सर्व तेली समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. आचार्य जितेंद्रनाथ महाराज श्रीनाथ पीठाधीश्वर, श्रीदेवनाथ मठ सुर्जी अंजनगाव यांच्या हस्ते पालखीचे पुजन करण्यात आले. संपूर्ण गावामधुन दिंडी पताका व भजन मंडळाच्या सोबतीने वाजत गाजत अतिशय उत्साहाने देवनाथ मठ, पाचपावली, गुलजारपुरा, पानअटाई, शनिवारा मार्गे तेलीपुऱ्यात आली. श्री संत संताजी जगनाडे महाराज न.प. प्राथमिक शाळेमधील मुख्याध्यापक, शिक्षक व सर्व विद्यार्थ्यांनी पालखीचे पुजन केले. तेलीपुऱ्यामधील मुख्य चौकामध्ये श्री संत संताजी जगनाडे महाराज चौक या फलकाचे पुजन करण्यात आले. व नंतर सावकारपुरा, काठीपुरा, बालाजी नगर, दर्यापूर रोड असा प्रवास करुन शेवटी पालखी देवगीरे नगर येथे पोहचली. जयंती महोत्सवाच्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी वैभव लेंधे, माजी उपनगराध्यक्ष यांनी भूषवले तर प्रमुख अतिथी म्हणून नंदकिशोर तिखिले, सह आयुक्त महानगपालिका अमरावती, सुधीर त्र्यंबकराव राठोड कुलसचिव, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोला, गीता देवगीरे, माला डोईफोडे, (महिला जिल्हा उपाध्यक्षा भाजपा अमरावती), महेंद्र दिपटे, उपजिल्हाप्रमुख (उबाठा शिवसेना), हे उपस्थित होते. सर्व प्रमुख अतिथींचा सत्कार आचार्य जितेंद्रनाथ महाराज यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व श्रीसंत संताजी जगनाडे महाराज यांची प्रतिमा देवून करण्यात आला.

# श्री समर्थ रामगीर महाराज पुण्यतिथी महोत्सवाचे आयोजन

## दि.17 ते 24 डिसेंबर पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांची पर्वणी





**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, ( दि.15 )**-दरवर्षी प्रमाणे यंदाही येथील श्री समर्थ रामगीर महाराज पुण्यतिथी महोत्सवाचे तसेच भव्य यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. आहे. दि.17 ते 24 डिसेंबर पर्यंत विविध धार्मिक कार्यक्रमांची भाविक भक्तांकरित राहणार आहे.

मंगळवार (दि.17) रोजी सकाळी 5 ते 7 'काकडा आरती' वारकरी भजनी मंडळ व अ.भा.गुरुदेव सेवा मंडळाचे आयोजन होणार आहे. तसेच दररोज नित्य नियमाने सकाळी 9 ते 12 व दुपारी 2 ते 5 'श्रीमत् भागवत कथा' प्रवचनकार ह.भ.प.मुकुंद महाराज खाडे, मु.पो.शिरजगांव मोझरी यांच्या अमृततुल्य वाणीतून होणार आहे. सायंकाळी 7 ते 8 वाजता 'सामुदायिक प्रार्थना' अ.भा.गुरुदेव सेवा मंडळ, अंजनगाव बारी तर रात्री 8 ते 9 'हरिपाठ' वारकरी भजनी मंडळ व अ.भा.गुरुदेव सेवा मंडळ, अंजनगाव बारी करण्यार असुन श्री समर्थ रामगीर महाराज यांच्या तीन अध्यायाचे पारायण दि.17 ते 24 सकाळी 10 ते 12 वाजेपर्यंत महिला मंडळातर्फे आयोजित करण्यात येणार आहे. तसेच सप्ताहाच्या सर्व विविध भजन मंडळांकडून भजनाचे आयोजन केल्या जाणार आहे.

शेवटी दि.24 रोजी सकाळी 'गोपाळकाला किर्तन' किर्तनकार ह.भ.प. घनश्याम महाराज तायवाडे, मु.पो.अंदोरी, ता.चांदूर रेल्वे,जि.अमरावती, दुपारी 2 ते 6 वाजेपर्यंत 'भव्य महाप्रसाद' रात्री 9 ते 12 दहिहंडी किर्तनकार- ह.भ.प. नामदेव महाराज निचत, मु.पो.नांदगाव खंडेश्वर, अमरावती 'चंद्र आगमणावर दहिहंडी' श्री प्रसन्नगीर महाराज गुरु कैलासगीर महाराज गोस्वामी यांच्या हस्ते होणार आहे. या सर्व कार्यक्रमाला गावातील गणेशोत्सव मंडळ व दुर्गा उत्सव मंडळ तसेच गावातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहून आपले सहकार्य करण्याचे आवाहन देवस्थानचे मठाधिपती श्री प्रसन्नगीर महाराज गुरु कैलासगीर महाराज गोस्वामी यांनी केले आहे.

# संत्रानगरी वरूड शहरात श्री श्याम संकीर्तन

## 19 डिसेंबरला आयोजन




**महासागर प्रतिनिधी**
**वरुड,( दि.15 )**- खाटु श्याम भक्तांच्या आग्रहास्तव शहरालगतच असलेल्या बाप्पा मोरया लॉन येथे एक श्याम खाटु वाले के नाम श्री श्याम संकीर्तन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त श्याम भक्तांनी उपस्थित राहुन कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आवाहन आयोजकांनी एका प्रसिद्धी पत्रकातुन केले आहे. खाटु श्याम वर अफाट श्रध्दा ठेवणाऱ्या भक्तांकरीता शहरालगतच असलेल्या अमरावती - पांढुर्णा राष्ट्रीय महामार्गावरील बाप्पा मोरया लॉन येथे 19 डिसेंबर रोज गुरुवारला सायंकाळी 6.30 वाजता पासुन कानपुर येथील पार्श्व गायक अभिषेक शुक्ला तसेच नागपुर येथील पाश्व गाईका कृष्ण प्रिया यांचे मधुर वाणीतून 'एक श्याम खाटु वाले के नाम' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त श्याम भक्तांनी उपस्थित राहुन कार्यक्रमाचा आनंद घेण्याचे आवाहन बंटी उर्फ राजेश खुटेटा ( खंडेलवाल ), पिंटु कवटकर, सोनल चौधरी (अग्रवाल ) यांनी एका प्रसिद्धी पत्रकातुन केले आहे.

# लग्नघरातून रोख रक्कम व दागिने चोरले

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.15 )**- आसेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीतील असदपूर येथील रहिवासी जुनेद जकी खान अजमत खान यांच्या घरातून चोराने रोख रक्कमेसह दागिने असा एकुण 1 लाख 25 हजाराचा मुद्देमाल लंपास केला. जुनेद जकी खान हे त्यांच्या मुलीच्या रिसेप्शनला गेले होते. तेथून ते परत घरी आले असता त्यांना घराचे कुलूप तुटलेले दिसले व अज्ञात चोरट्यांनी घरातून रोख 63 हजार रुपये, 3 ग्रॅम सोन्याची अंगठी 21 हजार रुपये, कर्णफुले 4 ग्रॅम वजनाचे 20 हजार रुपये व चांदीचे दागिने 21 तोळे असा एकूण 1 लाख 25 हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याचे दिसून आले. जुनद जकी यांच्या फिर्यादीवरून आसेगाव पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# लाडक्या बहिणींमध्ये धाकधुक



**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट,( दि.15 )**- लाडकी बहीण योजनेचा लाभ राज्यात 2.3 कोटी महिलांना मिळत आहे. सर्वांना डिसेंबर महिन्याच्या हप्त्याची प्रतिक्षा आहे. लाभ घेणार्या संतुष्ट व लाभ न घेणाऱ्या असंतुष्ट बहीणीनींनीही महायुतीस भरभरुन मतं दिलीत. मात्र या दिवास्वप्न योजनेला निकष लावून अपात्र, पात्र अशी चाळण लागणार आहे, आणि वेळप्रसंगी फौजदारी कारवाई होणार असल्याचे सांगितल्या जात असल्याने लाडक्या बहिणींमध्ये तडतडाट होताना दिसत आहे.

मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत सर्वसमावेशक कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. त्याचाच एक भाग म्हणून राज्याच्या महिला आणि बाल विकास विभागाचे अधिकारी घरोघरी जाऊन कागदपत्रांची उलट तपासणी करणार आहेत. प्रत्येक लाभार्थ्यांच्या घरांना प्रत्यक्ष भेटी दिल्या जातील, त्यानंतर सर्व डेटा तपासला जाईल. आणि पात्र, अपात्र ठरवले जाईल. लाडकी बहीण योजनासाठी ज्यांनी खोटे दावे केलेत, त्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात यावा, असा प्रस्ताव महिला आणि बाल विकास विभागाने केला आहे. तसेच चुकीच्या पद्धतीने मिळालेले लाभ परत करण्याचा पर्याय दिला जाईल, अशी माहिती मिळत आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये लाडकी बहीण योजनेच्या कागदपत्रांची पडताळणी केली जाणार आहे. जिल्हा आणि विभागीय स्तरावर तपासणी केली जाईल, असे महिला आणि बाल विकास विभागाच्या अधिकाऱ्याने सांगितले.

"मी विवाहीत असुन माझे रेशनकार्ड मध्ये नाव समाविष्ट असुन माझ्या वडीलांच्या नावे लाडक्या बहीण योजनेत समाविष्ट असणारे उत्पन्नाचे प्रमाणपत्र असुनही मला लाडक्या बहीणीचा लाभ मिळाला नाही. यावर आमची लाडकी बहीण आदिती तटकरे काय कारवाई करतील मला लाभ नाही. मिळाला तरी चालेल मात्र सरकारने फक्त निवडनुकीत लाभ मिळावा. या अपेक्षेनेच ही योजना राबवली असे माझे व्यक्तीगत मत आहे. मला वाटते सरकारने सर्वांची तपासणी करुनच लाभ द्यावा. ही विनंती वेळप्रसंगी गुन्हे दाखल केल्यास मी त्याचे समर्थन करेल.

**- कृतिका संतोष क्षीरसागर,** पथ्रोट.


**घरोघरी जाऊन होणार तपासणी**

**अपात्र लाडक्या बहीणीवर गुन्हा दाखल होणार का ?**

**सरकार घेणार मोठा निर्णय ?**

# शिक्षकांवर शाळाबाह्य कामांचा अतिरिक्त ताण?

## इंग्रजी शाळांचा वाढता प्रभाव



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.15 )**- इंग्रजी शाळांचा वाढता प्रभाव, पालकांची बदलती मानसिकता, गाव नेतृत्वाची प्राथमिक शाळांबाबतची कमी झालेली आत्मीयता, उदासीनता व शासनाने शिक्षकांवर लादलेले शाळाबाह्य कामकाज आदी कारणांमुळे प्राथमिक शाळांचा जणू अस्तित्वासाठी संघर्ष सुरू आहे. या शाळा कोणत्याही परिस्थितीत टिकल्याच पाहिजेत; अन्यथा उपेक्षित, वंचित व गोरगरिबांच्या मुलांना शिक्षण मिळणे दुरापास्त होईल, असे मत व्यक्त होत आहे.

थोर पुरूषांनी प्राथमिक शिक्षणाचे अनन्यसाधारण महत्त्व जाणून या शिक्षणाला चालना देण्याचा प्रयत्न केला, पण आज शासनाच्या दुर्लक्षामुळे की काय प्राथमिक शाळा टिकणार की नाही, अशी चर्चा होत आहे. याउलट अनेक खासगी शिक्षण संस्था राजकीय नेत्यांच्या असल्याने त्यासाठी संस्थाचालकांची धडपड व आत्मियता असते, पण प्राथमिकशाळांना वाली कोण? विद्यार्थी संख्या घटली, वर्ग कमी झाले तर काय?, असा प्रश्न राज्यकर्त्यांना पडतच नाही का, असे चित्र आहे. पालकांमध्येही प्राथमिक शाळांविषयी दुजाभाव निर्माण झाला आहे. इंग्रजी माध्यमांमधील शाळा गुणवत्तेपेक्षाही जाहिरातबाजी, झगमगाट याला भूलणारा पालक पाहायला मिळत आहे. इतरांची मुले त्या शाळेत जातात, तर आपली का नकोत या भूमिकेतून पालक सरकारी प्राथमिक शाळांकडे पाठ फिरवत आहेत. तळमळीने ज्ञानदान हा जरी एक विषय असला, तरी शासनाकडून जे विविध प्रयोग होत आहेत त्यातील अनेक प्रयोग हे कागदावरच होत असल्याने शिक्षणाचा गोंधळ झाल्याची प्रतिक्रिया पालक व्यक्त करीत आहेत. शासनाच्या ज्या सुविधा आहेत. त्या वेळेत मुलांना मिळणे गरजेचे आहे. आजही विद्यार्थी गणवेशाच्या प्रतीक्षेत आहेत.

### शाळांचे पुढचे पाऊल

जिल्हा परिषदेमार्फत शैक्षणिक गुणवत्ता व्यक्तिमत्त्व विकास यावर भर देऊन प्राथमिक शाळा व शिक्षणाचा पाया मजबूत केला जातो. प्रत्येक वर्षी पट नोंदणी, शाळा इमारत, शिक्षक, संस्था याचा आढावा घेऊन शाळाबाह्य मुलांच्या शिक्षणासाठी धोरण राबविले जाते. या शाळा टिकणे सध्या गरजेचे बनले आहे.

"प्राथमिक शाळांतील शैक्षणिक गुणवत्ता चांगली आहे. अशा स्थितीत शिक्षकांकडे असलेली अनेक अशैक्षणिक कामे देणे बंद करावे,जेणेकरून विद्यार्थ्याकडे अधिक लक्ष देता येईल. याशिवाय जिल्हा परिषदेच्या शाळेत आवश्यक असलेले साहीत्य व आवश्यक भौतिक सुविधेसाठी शासन व स्थानिक स्वराज्य संस्थानी उपलब्ध करून द्याव्यात सोबतच तसेच मुलांना शाळेत पाठवण्यासाठी पालकांना प्रवृत्त करावे.

**-राजेश सावरकर**
राज्य प्रतिनिधी प्राथमिक शिक्षक समिती

# सिकलसेल आजार जनजागृती सप्ताहनिमीत्त गावात प्रभातफेरी

## मेळघाटच्या मोथा उपकेंद्राचा पुढाकार



**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.15 )**- सिकलसेल आजारबाबत जनजागृती करण्याकरिता नुकतीच मोथा उपकेंद्राच्या वतीने गावात प्रभातफेरी काढण्यात आली. यावेळी उपकेंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ.नीता नागले, आरोग्य सहायक अशोक सुरत्ने, आरोग्य सेवक प्रवीण निंभोरकर, आरोग्य सेविका हिना सौदागर, प्रविणा धाकडे सह आशा सेविका, अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

सिकलसेल आजार जन जागृती सप्ताह 11 ते 17 डिसेंबर 2024 या दरम्यान संपूर्ण जिल्हयातील आरोग्य संस्था मध्ये साजरा करण्यात येत आहे. जिल्हयातील सर्व आरोग्य संस्था स्तरावर सिकलसेल आजाराची तपासणी व मार्गदर्शन शिबिरांचे नियोजन करण्यात आले आहे. जास्तीत जास्त लोकांनी आपली सिकलसेलची रक्त तपासणी जवळच्या उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामिण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय येथे जाऊन आरोग्य विभागाकडून आवाहन केले आहे. याच अनुषंगाने सिकलसेल आजार हा अनुवांशिक असून आई-वडिलांपासून अपत्यांना होतो. सिकलसेल हा रक्त पेशीशी संबधीत आजार आहे. सामान्य रक्त पेशी या वर्तुळाकार व लवचिक असतात तर सिकलसेल रक्त पेशी या विळ्याच्या आकारच्या व ताठर असतात. या आजाराला प्रतिबंध करायचा असेल तर वाहक-रुग्ण, वाहक वाहक, रुग्ण रुग्णा यांनी आपआपसात विवाह करुन नये. कारण होणारे अपत्य हे सिकलसेल वाहक किंवा रुग्ण होऊ शकते. सिकलसेल हा अनुवांशीक आजार आहे. सिकलसेल आजाराचा संपूर्ण उपचार नाही, पण नियंत्रण शक्य आहे. सिकलसेल रुग्णांस नियमित आणि समतोल आहार आवश्यक आहे. सिकलसेल रुग्णांचे योग्य औषधोपचाराने आयुष्य वाढते, हे महत्वाचे.